गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २७४ वा ● शनिवार २४ फेब्रुवारी २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 274 | Date : 24/02/2024 blow :Saturday Page 4 Price 4

## आज रायगडावर राष्ट्रवादीची 'तुतारी' वाजणार

रायगड : केंद्रीय निवडणूक आयोगाने शरद पवार गटाला 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार' असे नवीन नाव आणि 'तुतारी' हे नवीन निवडणूक चिन्ह दिले आहे. आयोगाने दिलेल्या याच चिन्हाचे उद्या (शनिवारी) किल्ले रायगड येथे अनावरण करण्यात येणार आहे, अशी माहिती शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने 'एक्स' पोस्ट करत दिली आहे. 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार' या पक्षाने पोस्टमध्ये म्हटले आहे की, आता अवघा देश होणार दंग, शरद पवारांच्या साथीने फुंकले जाणार विकासाचं रणशिंग! 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्षशरदचंद्र पवार'ला मिळालेल्या 'तुतारी वाजवणारा माणूस' या पक्ष चिन्हाचा अनावरण सोहळा उद्या (शनिवारी) किल्ले रायगड येथे होणार आहे.

## तुतारी असणारी राष्ट्रवादी संपत चालली आहे : चंद्रशेखर बावनकुळे

सांगली : तुतारी असणारी राष्ट्रवादी संपत चालली आहे अशी टीका करीत बारामतीतील महायुतीचा विजय हा राज्यातील सर्वात मोठा विजय ठरेल असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी इस्लामपूर येथे केले. माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांच्या रयत क्रांती संघटनेच्या पुढाकाराने आज शेतकरी, कामगार परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेस महायुतील घटक पक्षांचे वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना श्री. बावनकुळे म्हणाले, तुतारी चिन्ह असणाऱ्या राष्ट्रवादीतुन अजित पवारांच्या राष्ट्रवादीत दररोज पक्षप्रवेश होत आहेत. त्यामुळे तुतारी असणारी राष्ट्रवादी संपत चालली आहे. पण त्यांना चिन्ह मिळाले, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. मात्र ही निवडणूक मोदी गॅरेंटीवर होणार आहे.

बारामती लोकसभा मतदार संघातल्या स्थितीबाबत बोलताना ते म्हणाले, बारामती मध्ये अजित पवार जो उमेदवार देतील तोच अंतिम असेल आणि त्या उमेदवाराला ६० टक्के पेक्षा जास्त मते मिळतील, आणि बारामतीचा विजय महाराष्ट्रातील सगळ्यात मोठा विजय ठरेल. लोकसभा जागाबाबत एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि केंद्रीय नेतृत्व बैठक घेऊन ठरवेल. जागा ठरल्यानंतर त्या निवडून आणण्याचा प्रयत्न महायुतीचे सगळे पक्ष करतील असेही ते म्हणाले.

# लातूर-टेंभुर्णी महामार्ग लवकरच चारपदरी

## केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

धाराशिव : लातूर ते टेंभुर्णी या महामार्गाची दुरावस्था पाहून आपल्यालाही शरम वाटते. यापूर्वीच या रस्त्याचे काम पूर्ण होणे गरजेचे होते. मात्र आता लवकरच हा रस्ता चारपदरी महामार्गात रूपांतरित केला जाणार असल्याची घोषणा केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी केली. धाराशिव जिल्ह्यातील महामार्गाच्या प्रलंबित कामांसाठी २२० कोटी रूपये अधिकचा निधी मंजूर केला आहे. त्यापैकी १७४ कोटी रूपयांच्या विकासकामांचे आज भूमिपूजन होत असल्याची माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली.

धाराशिव शहरातील सिध्दाई मंगल कार्यालय येथे केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या हस्ते ऑनलाईन पध्दतीने १७४ कोटी रूपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील, सेवानिवृत्त सनदी अधिकारी तथा मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी, जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, भाजपाचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे यांच्यासह



पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.पुढे बोलताना गडकरी म्हणाले की, लातूर-टेंभुर्णी हा मराठवाडा आणि पश्रि्चम । पान २ वर

## सरकारने आरक्षण दिले, आता जरांगेंनी अट्टहास सोडावा : देवेंद्र फडणवीस



नागपूर : मराठा समाजाला आरक्षण देताना इतर समाजाचे आरक्षण काढणार नाही असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आधीच स्पष्ट केले होते. ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवत मराठा समाजाला सरकारने आरक्षण दिले आहे. त्यामुळे ओबीसी समाजात समाधान तर मराठा समाजात आनंद व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता जरांगेंनी अट्टहास सोडावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. फडणवीस शुक्रवारी नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.फडणवीस म्हणाले, मराठा समाजाला आरक्षण सरकारने दिले आहे. त्यामुळे कोणीही जनतेला त्रास होईल असे आंदोलन । पान २ वर



## ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्य सुविधेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र महत्वाचे : पालकमंत्री चंद्रकांत पाटील

***पंढरपूर तालुक्यातील विविध विकास कामांचे लोकार्पण *आरोग्य विभागात क व ड संवर्गातील ११ हजार पदे भरण्यात येत असून १ हजार ७५० डॉक्टरांची पदभरती प्रक्रिया सुरू**

पंढरपूर/प्रतिनिधीः गावातील प्रत्येक नागरिकाला स्थानिक पातळीवर आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून भर दिला जात आहे. ग्रामीण भागातील जनतेला वेळेवर आरोग्य सुविधा देण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र महत्वाचे असून, नूतन इमारतीमुळे नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होतील.असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केले

पंढरपूर तालुक्यातील आयुष्यामान आरोग्य मंदीर प्राथमिक आरोग्य केंद्र व पशुवैद्यकीय दवाखाना रांझणी, आयुष्यमान आरोग्य उपकेंद्र अनवली, सरकोली ते शंकरगाव रस्ता सुधारणा व देखभाल कामाचे लोकार्पण पालकमंत्री चंद्रकात पाटील व आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खासदार जय सिध्देश्र्वर महास्वामी, आमदार समाधान आवताडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, प्रांताधिकारी सचिन इतापे, तहसिलदार सचिन लंगुटे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संतोष नवले, गटविकास अधिकारी मिरगणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.बोधले, उमेश परिचारक, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य वसंत नाना देशमुख, प्रा.शिवाजी सावंत यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीमुळे नागरिकांना २४ तास आरोग्य सुविधा । पान २ वर

## पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते सांख्यिकी कार्यालयाच्या नूतन इमारतीचे लोकार्पण



सोलापूर/प्रतिनिधी : नियोजन भवन परिसरात जिल्हा सांख्यिकी कार्यालयाची नूतन इमारत सुमारे एक कोटी निधी खर्च करून बांधण्यात आलेली आहे. या इमारतीचे लोकार्पण उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नामफलक अनावरण व फीत कापून करण्यात आले. यावेळी इमारतीची पाहणी करून सांख्यिकी विभागाने उत्कृष्ट अशा या नवीन इमारतीमध्ये अधिक गतिमान पद्धतीने कामकाज करावे, असे त्यांनी सुचित केले.

यावेळी खासदार जयसिद्धेश्र्वर शिवाचार्य महास्वामी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अप्पर जिल्हाधिकारी । पान २ वर

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचा संविधान सन्मान मेळावा

### सोलापूर लोकसभेसाठी राजा भाऊ सरवदे यांना युतीतून उमेदवारी देण्यात यावी: प्रा.राहुल रुही

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापुरात रविवार २५ फेब्रुवारी रोजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचा वतीने सोलापुरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक नॉर्थकोर्ट मैदान येथे होणारा संविधान सन्मान मिळावा हा सोलापूर जिल्ह्यसह आगामी येऊ घातलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात निर्णायक ठरणार आहे महायुतीचा घटक पक्ष असलेल्या रिपाईला लोकसभेसाठी सोलापूरची जागा देऊन त्याठिकाणी प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांना उमेदवारी देण्याचे मागणी जील्हातून होत आहे.राज्यातील इतर ठिकाणची जागा देण्यासंदर्भात तसेच सोलापूर जिल्ह्यातील अकरा तालुक्यातील विधानसभेमध्ये या संविधान सन्मान मेळाव्याचा प्रभाव दिसून येईल महायुतीचा महत्त्वपूर्ण घटक पक्ष असलेल्या रिपाईला महायुतीने योग सन्मान देऊन रामदासजी आठवले साहेबांच्या नेतृत्वात सोलापूरची लोकसभेची जागा रिपाईचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे साहेबांना सोडण्यात यावी आणि शिर्डीचे लोकसभा ही केंद्र राज्यमंत्री रामदास आठवले यांना सोडण्यात यावी अशी आग्रहाची मागणी कार्यकर्त्यांची असून संविधान सन्मान मिळवला प्रचंड मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते शक्तीप्रदर्शन करणार असून आपल्या नेत्यांपर्यंत आपल्या भावना पोहोचवणार आहेत सोलापूर जिल्ह्यात रिपाईची प्रचंड मोठी ताकद असून आज पर्यंत महायुतीला यश हे रामदासजी आठवले व राजाभाऊ सरवदे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे मिळाले असून महायुतीच्या नेत्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या एकत्र सन्मान



राखावा अशी कार्यकर्त्यांची तीव्र भावना आहे केंद्रात पुन्हा तिसऱ्यांदा नरेंद्र मोदी पंतप्रधान होण्यासाठी रिपाईची साथ मोलाची असून राज्यात रिपाइ शिवाय सत्ता संपादित करणे अवघड आहे सोलापूर जिल्ह्यातील महायुतीच्या ज्या विधानसभेच्या जागा आहेत त्या राखण्यासाठी आणि नवीन जागा निवडण्यासाठी रिपाई निर्णय भूमिका बजावू शकते अशी मत यावेळी यशसिद्धी न्युजशी बोलताना रीपाई नेते प्रा.राहुल रुही यांनी व्यक्त केले आहे संविधान सन्मान मेळाव्याच्या अनुषंगाने लवकरच रिपाई नेते राहुल रुही यांना पक्षाच्या पश्रि्चम महाराष्ट्राची एखादी जबाबदारी देण्याचे सुतोवाच यावेळी रिपाईचे प्रदेशाध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे यांनी केल्याचे प्रा. राहुल रुही यांनी सांगितले आहे या संविधान सन्मान मेळाव्याला जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी प्रचंड मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन रिपाई नेते प्रा. राहुल रुही यांनी केले आहे



# संपादकीय

## तो टाळणे महत्त्वाचे असते...

गुलजार आणि रामभद्राचार्य यांना ज्ञानपीठ जाहीर होणे हे संवेदना आणि अध्यात्म या संगमाचा गौरव आहे. पहाटेच्या गारव्यात गवताच्या हिरव्यागार पानावर अलवार उतरणाऱ्या दवाच्या थेंबासारखे शब्द कागदावर उतरवणारे गुलजार तरल संवेदनांचे जादूगारच म्हणायला हवेत. संपूरन सिंह कालरा म्हणजेच गुलजारांच्या नावाला तरलता, पाऊस, पहाट, जाणिवा, प्रेम, संवेदना असे शब्द पर्याय ठरू शकतात. ज्ञान किंवा ज्ञानपीठ हा शब्द गुलजारांच्या लेखनाशी बदलत्या अर्थाने थोडासा विसंगत वाटावा. ज्ञान म्हणजे या अर्थाने माहितीचा संचय असा अर्थ गुलजारांशी सुसंगत नाहीच. ज्ञानाचा अर्थ प्रेमात शोधता येत नाही, तर प्रेमाचा अर्थ ज्ञानियाला उमजतोच असेही नाही. म्हणून प्रेम किंवा मानवी जाणिवा या ज्ञानाशी विसंगतच असाव्यात. गुलजारांचे लेखन म्हणजे नज्म, गजल टोकदार नाहीच असे नाही. मात्र, त्यांच्या शब्दांना धार नाही असेही नाही. परंतु, ही धार 'खुशबू बिखेरणाऱ्या' गुलाब-मोगरा किंवा पारिजात फुलांच्या पाकळ्यांची असावी. गुलजारांच्या लेखनात ज्ञानाचा अहंकार नाहीच नाही, ज्ञानासोबत प्रसंगी कठोरता, निर्णयक्षमता, अधिकारवाणी असले काहीसे येऊ शकते. ज्ञानाचा संबंध माणसाच्या नैतिक जाणिवेपेक्षा त्याच्या आत्मानुभूतीशी जोडल्यावर रवींद्रनाथ किंवा कुसुमाग्रज या नावांसोबतच ज्ञानपीठ हा शब्द साजेसा होतो. गुलजारांच्या बाबतीतही हीच आत्मानुभूती ज्ञानपीठ सोबत येते, हे ा पुरस्काराचे यशच आहे. गुलजारांनी बरेच लिहिले आहे. त्यांनी चित्रपटांच्या कथा, पटकथा, गाणीही लिहिलीत, दिग्दर्शनही केले आहे. अगदी ऑस्करची बाहुली गुलजारांचा जय हो म्हणत त्यांच्या दिवाणखान्यात विराजमान झाली आहे. कवी आणि कवितेवर आधीच्या काळाचा प्रभाव असण्याला कवीचा नाइलाज असतो. मात्र, गुलजारांवर काळाचा सकारात्मक किंवा नकारात्मक प्रभाव नाही. त्यामुळेच त्यांचे शब्द टोकदार आणि हळुवारपणाच्या मध्यममार्गातून नदीसारखे वाट काढत कागदाच्या डोंगरदऱ्यातून धावत असतात. गुलजारांच्या लेखनातले शब्द केवळ जागा भरण्याची कामे करत नाहीत, त्यांना एक शांततेचा अर्थ असतो, ही शांतता मौन असते, जगातल्या रोजच्या 'जगण्याच्या आवाजात' अशी मनातली शांतता ऐकू येत नाही, मग माणसे हळूहळू बहिरी होऊ लागतात, हे बहिरेपण बधिरतेपर्यंत पोहोचण्याच्या आत त्यावर इलाज करावा लागतो. अन्यथा हे बधिरलेपण हळूहळू माणसाला कुठल्याही संवेदना नसलेल्या निपचितपणाकडे घेऊन जाते, हा माणसाचा मृत्यूच असतो. तो टाळणे महत्त्वाचे असते.

पान १ वरुन

## लातूर-टेंभुर्णी महामार्ग..

महाराष्ट्राला जोडणारा महत्वाचा मार्ग आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी तो अत्यंत महत्वपूर्ण आहे. आजच्या घडीला या महामार्गाची प्रचंड दुरावस्था झाली आहे. लवकरच हा महामार्ग चारपदरी केला जाणार आहे. त्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. मराठवाड्यात चांगले रस्ते झाले, तरच मराठवाड्याचा विकास होईल आणि शेतकर्यांना आपल्या शेतातील उत्पादने कमी वेळात मोठ्या बाजारपेठेत पोहोचवता येतील. त्यातून मराठवाड्याचा सर्वांगीण विकास होईल. त्यामुळेच आपण लवकरात लवकर लातूर ते टेंभुर्णी हा चारपदरी महामार्गही पूर्ण करणार असल्याची घोषणा गडकरी यांनी यावेळी केली.

## सरकारने आरक्षण दिले,..

करू नये. जरांगे पाटील यांना याबाबत सांगण्यात आले असून त्यांनी आता आंदोलनाचा अट्टाहास सोडावा. आरक्षणाबाबत न्यायालयाने काय म्हटले मला माहिती नाही, असेही ते म्हणाले.

नागपुरात पर्नोड रिकार्डसमवेत सामंजस्य करार होणार असून त्या कार्यक्रमासाठी आलो आहे. जवळपास २५ हजार कोटींचे करार होणार आहेत. पस्तीस हजार एकरातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. रोजगाराची निर्मिती होणार आहे, त्यामुळे हा महत्त्वाचा प्रकल्प असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## ग्रामीण भागातील जनतेच्या आरोग्य..

मिळेल. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी केंद्रातील सुविधांचा नागरिकांसाठी क्षमतेने उपयोग करावा. एक ही गरजू रुग्ण आरोग्यसेवेपासून वंचित राहणार नाही यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रांनी मानवतेच्या दृष्टिकोनातून दर्जेदार सुविधांचा लाभ उपलब्ध करून दिला पाहिजे. तसेच आयुषमान भारत योजनेंतर्गत प्रत्येक कुटुंबाला ५ लाख रुपयांपर्यंत उपचार सुविधा मिळू शकतात. आरोग्यावर होणारा खर्च उपचार घेणाऱ्या व्यक्तीला देण्याची गरज नाही. यासाठी प्रत्येक कुटुंबाने आयुष्यमान कार्ड काढावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

यावेळी आरोग्यमंत्री तानाजी सावंत म्हणाले, आरोग्य केंद्राच्या माध्यमातून रुग्णांना स्थानिक पातळीवर आवश्यक आरोग्य सेवासुविधा मिळाव्यात, प्रत्येकाने काटेकोरपणे आपली जबाबदारी पार पाडावी. आरोग्य केंद्राच्याबाबतीत कोणाचीही तक्रार येणार नाही यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. नागरिकांना आरोग्य केंद्रात तात्काळ व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात तसेच आरोग्य केंद्रातील साधन सामुग्रीचा वापर व्हावा. तसेच पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी आरोग्य विभागाच्या माध्यमातून पदभरती प्रक्रिया सुरु आहे. आरोग्य विभागात क व ड संवर्गातील ११ हजार पदे भरण्यात येत असून १ हजार ७५० डॉक्टरांची पदभरती प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे राज्यातील प्रत्येक आरोग्य केंद्र, शासकीय रुग्णालय याठिकाणी पुर्णक्षमतेने वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपलब्ध होणार आहेत. त्याचबरोबर राज्यातील प्रत्येक तालुक्यात डायलेसीस सेंटरची उभारणी केली जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी आमदार समाधान आवताडे म्हणाले आयुष्यमान भारत योजनेतून उभारलेल्या आरोग्य उपकेंद्राचा ७ ते ८ गावांतील नागरिकांना लाभ होणार आहे. आरोग्य विभागाकडून पंढरपूर येथे २०० बेडचे तर मंगळवेढा येथे १०० बेडचे रुग्णालय सुरु करण्याबाबत मान्यता मिळाली असल्याचे सांगितले. रांझणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामुळे पंढरपूर तालुक्यासह मंगळवेढा तालुक्यातील नागरिकांना याचा लाभ होणार असल्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य वसंत देशमुख यांनी यावेळी सांगितले.

## पालकमंत्री पाटील यांच्या

मोनिका ठाकूर सिंग, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, सांख्यिकी उपसंचालक दिनकर बंडगर, श्री. माळी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे, सहाय्यक नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह सांख्यिकी व नियोजन विभागाचे अन्य अधिकारी उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने नियोजन भवन परिसरात जिल्हा सांख्यिकी कार्यालय व जिल्हा नियोजन समितीच्या अभिलेख कक्षासाठी सुमारे एक कोटी निधी खर्च करून ४१४ चौरस मीटर अशी दुमजली इमारत बांधण्यात आलेली आहे. या इमारतीमध्ये अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना स्वतंत्र केबिन देण्यात आलेल्या आहेत. तसेच बाह्य व अंतर्गत पाणीपुरवठा, जल निसारण, विद्युतीकरण, फर्निचर व अकस्मिक खर्च इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आल्याची माहिती कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे यांनी दिली.

# आदर्श, कर्तव्यनिष्ठ व निष्कलंक मुख्याध्यापक

जनता विद्यालय, डुबेरे या शाळेचे मुख्याध्यापक श्री.किशोर सुकदेव जाधव हे ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर शासकीय नियमानुसार २९ फेब्रुवारी २०२४ ला सेवानिवृत होत आहे.त्यानिमित्ताने

सरांची यशोगाथा

काही माणसांच्या अंगी प्रचंड धडपड शक्ती असते. काही तरी करण्याची संधी मिळेल त्या ठिकाणी ते कार्यरत होत असतात. असेच धडपड करणारे एक व्यक्तिमत्व शैक्षणिक क्षेत्रात नावारूपाला आले, ते म्हणजे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डुबेरे तालुका - सिन्नर या शाळेचे कार्यनिष्ठ व कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक श्री.किशोर सुकदेव जाधव सर.

सिन्नर येथे सरांचा जन्म २४ फेब्रुवारी १९६६ साली झाला. वडील सुकदेव जाधव व आई शकुंतला यांनी सरांवर केलेल्या योग्य संस्कारामुळे सर आज उच्च पदाला पोहचले आहे. सरांचे वडील याच संस्थेत शिक्षक होते.सरांनी प्राथमिक , माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण सिन्नर येथे पूर्ण केले. ईील. इ. एव.शिक्षण असलेल्या जाधव सरांनी डिसेंबर १९९० यावर्षी शैक्षणिक क्षेत्रात पदार्पण केले. मविप्र संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांच्या सहवासात व कृपाछत्राखाली सरांची सेवा संपन्न झाली. नाशिक जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्र राज्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था असलेल्या मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत त्यांना उपशिक्षक म्हणून नोकरी मिळाली. त्यांच्या शैक्षणिक कार्याची सुरुवातच न्यू इंग्लिश स्कुल नांदगाव या ठिकाणी झाली. पुढे सरांनी मांडवड , सोनांबे ,डुबेरे,गिरणारे, धोंडेगाव,इगतपुरी, मनेगाव या ठिकाणी उपशिक्षक म्हणून काम केले.सातपूर या ठिकाणी पर्यवेक्षक तर सिन्नर या ठिकाणी उपमुख्याध्यापक म्हणून काम केले. जुलै २०२१ पासून डुबेरे येथे मुख्याध्यापक म्हणून काम करीत आहे.



सरांनी गणित व विज्ञान विषयाचे उत्कृष्ट अध्यापन केले. सरांचे या विषयावर प्रभुत्व होते.विषयज्ञान व अध्यापन कौशल्य यांच्या जोरावर सरांनी या विषयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली. त्यामुळेच ते विद्यार्थीप्रिय शिक्षक व मुख्याध्यापक झाले. सेवा करीत असताना सरांनी एस.एस.सी. बोर्डाचे परीक्षक ,नियामक, प्रमुख नियामक ,पेपर सेटर ,विषय प्रमुख असे विविध कामे यशस्वीपणे सांभाळलेले आहे.

आयुष्यातील कोणत्याही चांगल्या-वाईट गोष्टीचा कोणताही परिणाम सरांनी आपल्या अध्यापनावर व प्रशासकीय कामकाजावर होऊ दिला नाही. व होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली होती. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेचे महत्व रुजावे तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक स्वच्छता,वर्गाची स्वच्छता, शालेय परिसराची स्वच्छता ,शालेय शिस्त व गुणवत्ता निर्माण व्हावी यासाठी सरांनी अनेक उपक्रम सुरू केला .या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबरोबरच शालेय शिस्त निर्माण झाली .विद्यार्थी स्वयंस्फूर्तीने अध्ययन करायला लागले.अध्यापनाचे काम करत असतानाच सहशालेय उपक्रमातील सांस्कृतिक कार्यक्रमातील विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती असेल. अशा सर्व ठिकाणी सरांनी आपले योगदान दिले आजही सरांचे विद्यार्थी सरांचे मार्गदर्शन घेतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन एन.डी .एस.टी सोसायटी तसेच शिवसेनेच्या वतीने त्यांना आदर्श शिक्षक, आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार सन्मानित करण्यात आले.नाशिक जिल्हा सेकंडरी टीचर्स सोसायटीचे चेअरमन, मविप्र सेवक सोसायटीचे तज्ञ संचालक, शिक्षक सोसायटी देवपूर चे संचालक आदी संस्थांवर काम केले आहे.

प्रत्येक शाळेवर सरांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. त्यामुळे त्या ठिकाणीही सर आपल्या कार्याने सर्वांना परिचित झाले . मुख्याध्यापक काम करीत असतांना सरांनी याठिकाणी शाळेच्या प्रांगणात विविध वृक्षांची लागवड करून संगोपन केले. शिक्षकांच्या मदतीने शाळेच्या मैदानावर कच टाकली.त्यामुळे विद्यार्थ्यांची धुळीच्या त्रासातुन कायमची सुटका झाली.सरांनी सेवाकार्यात शाळेची सर्वांगीण प्रगती ,पालकांशी सुसंवाद , विद्यार्थी व शिक्षकांच्या समस्या ,शाळेची शिस्त ,विद्यार्थ्यांचा पाणी पिण्याचा प्रश्न्न या व इतर सर्व बाबी मध्ये सरांनी लक्ष घातले. सरांनी आपल्या कार्याची चुणूक दाखवली.

सर अतिशय मनमिळाऊ ,मितभाषी व शांत स्वभावाचे आहेत. अचूक काम करून घेण्याची क्षमता, योग्य माणूस - योग्य काम, शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीचा वापर करून सरांनी शाळेला प्रगतीपथावर नेले.शाळेतील वृक्षसंवर्धन ,शाळेतील इमारतीची स्वच्छता , कर्मचाऱ्यांची अडचणी , विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास या सर्व बाबींमध्ये सरांनी जातीने लक्ष घातले व शाळेचा नावलौकिक जिल्ह्यात वाढविला.सरांच्या कार्य काळामध्ये गांधी रिसर्च फाउंडेशन परिक्षा जळगाव यामध्ये विद्यालयाच्या विद्यार्थिनीचा प्रथम क्रमांक आला.सरांच्या काळात विज्ञान प्रदर्शन,मविप्र मॅरेथॉन स्पर्धा,एन.एम.एम.एस परीक्षेत घवघवीत यश मिळाले सांस्कृतिक कार्यक्रमाचे अति उत्तम नियोजन केले. शालेय शैक्षणिक सहल ,शालेय वनभोजन , पालक मेळावा,शालेय वार्षिक तपासणी, विद्यार्थी संख्यात्मक व गुणात्मक वाढ या सर्व बाबींमध्ये विशेष लक्ष घातले, तब्बल ३३ वर्षांच्या सेवेनंतर ते २९ फेब्रुवारी २०२४ रोजी येथून सेवानिवृत्त होत आहेत. आपल्या प्रदिर्घ सेवेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले. त्यामुळे त्यांचा पालक संपर्क ही अतिशय मोठ्या प्रमाणात आहे.

असं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या श्री.जाधव सरांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात वावरतांना मोठ्या प्रमाणात मित्रपरिवार गोळा केला आहे. सरांनी छात्रभारती संघटना, राष्ट्र सेवादल या सामाजिक संस्थेत ठिकाणी उत्कृष्ट काम केले आहे व करीत आहे. नाशिक जिल्हा माध्यमिक शिक्षक संघटनेत जिल्हा उपाध्यक्ष,कार्यवाह पदावर तसेच सध्या नाशिक जिल्हा टीडीएफ संस्थेचे कार्याध्यक्ष म्हणून काम करत आहेत.जिल्हा विज्ञान अध्यापक संघटनेत जिल्हा कार्यवाह पदावर देखील काम करीत आहे.

प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे त्यांच्या अर्धानगीचे अर्थात पत्नीचे योगदान असते.सरांच्या सहचारिणी सौ. सुनिता याही त्यांच्या पाठीशी भक्कम उभ्या राहिलेल्या आहेत. त्यामुळे सरांना हा शैक्षणिक प्रवास करणे शक्य व सुलभ झाले.सरांना दोन मुले आहे. दोन्हीही चांगल्या पदावर कार्यरत आहेत. त्यांची पत्नी याच संस्थेत मखमलाबाद या ठिकाणी शिक्षिका म्हणून कार्यरत आहे.

सरांना सर्वांनी मोलाची साथ दिली आहे. त्यामुळे ते विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवू शकले. सरांचे अनेक विद्यार्थी उच्च पदापर्यंत पोहोचले आहेत. सरांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान अतिशय महत्वाचे आहे सतत आनंदी आणि हसतमुख असलेल्या श्री.जाधव सरांना सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य अगदी सुखासमाधानाचे ,आरोग्यदायी ,भरभराटीचे जाओ. दीर्घायुष्य लाभो .हीच ईश्र्वरचरणी मनोकामना !त्यांचे कार्य शैक्षणिक कार्य सदैव स्मरणात राहील.

**शब्दांकन-श्री.सोमनाथ गिरी (सर )**
**जनता विद्यालय डुबेरे**

# नरखोरी तांडा जळकोटवाडी येथे प्रेमे संबधास अडसर येण्याच्या कारणावरून झालेल्या खुनी हल्ल्यातील जखमी कामगाराचा म्रृत्यु

वागदरी/एस.के.गायकवाड : प्रेमसंबंधास अडसर येत असल्याच्या कारणावरून तुळजापूर तालुक्यातील नरखोरी तांडा जळकोटवाडी येते वीटभट्टीवर लेबर म्हणून कामास असलेल्या सहदेव महादेव मस्के यांच्यावर विठभट्टी मालकानेचेन धारधार कुराडीने प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी केले होते.सोलापूर येथे त्यांच्या वर उपचार सुरू होता. अखेर या प्राणघातक हल्लयातील जखमी सहदेव मस्के हा तब्बल तेरादिवस म्रृत्युसी झुंज देत दि.२२ फेब्रुवारी २०२४ दुपारी ठिक ४.०० वाजण्याच्या सुमारास त्यांनी प्राण सोडला.



या बाबत माहिती असी की एका महिला कामगारा बरोबर प्रेमसंबंध जोडत असताना या प्रेसंबधास अडसर ठरत असल्याच्या कारणावरून वीटभट्टीचालक उत्तम राठोड यांनी जिवे मारण्याच्या उद्देशानेच

माझे वडील सहदेव महादेव मस्के यांच्यावर दि.१०फेब्रुवारी २०२४ रोजी रात्री ११.३० वा.दरम्यान कुराडीने प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी केल्याची फिर्याद अक्षय सहदेव मस्के यांनी नळदुर्ग पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.या प्राणघातक हल्लयातील जखमी सहदेव महादेव मस्के हा तब्बल तेरा दिवस म्रृत्युसी झुंज देत होता. अखेर दि.२२ फेब्रुवारी२०२४ रोजी दुपारी ठिक ४.०० वा.दरम्यान सोलापूर येते शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान त्याचा म्रृत्यु झाला आहे.

सदर घटनेतील आरोपीवर कलम ३०२ नुसार गुन्हा नोंद झाला असला तरी या प्राणघातक हल्लयातील जखमी सहदेव मस्के यांचा म्रृत्यु झाल्याचे कळविण्यासाठी नातेवाईकानी संबंधित तपास आधिकारी याना फोन केला असता त्यांनी बेजबाबदार पणे भाषा केल्याचे समजते तरी वरिष्ठाधिकारी यांनी सदर प्रकरणी जाणिव पुर्वक लक्ष देवून या प्रकरणातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून मयत कुटुंबला योग्य तो न्याय द्यवा असी मागणी होते आहे.अन्यथा रिपाइं (आठवले) च्या वतीने यासंदर्भात तिव्र आंदोलन करण्यात येईल असा ईशारा देण्यात येत आहे.

# कृष्णकमल हॉटेल व लॉजिंगचे थाटामाटात उदघाटन

अक्कलकोट/प्रतिनिधीः कृष्णकमल हॉटेल व लॉजिंग या वास्तुचे मोठया थाटामाटात गुरूवारी उदघाटन सोहळा पार पडला. बंजारा चेतना परिषदेचे रवि पवार यांच्या मातोश्री कमल यांच्या शुभ हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार,इंद्रजीत पवार,अक्कलकोट बंजारा चेतना परिषदेचे तालुका अध्यक्ष तुकाराम राठोड,यशवंत राठोड,पीएसआय राजू राठोड,धर्म जागरणाचे जिल्हाप्रमुख,प्रशांत हरकुळ,सुशांत झुंजे,धर्म जागरणाचे लक्ष्मीकांत बिराजदार,संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सोमनाथ राऊत,सुनील जाधव,पत्रकार विश्र्वनाथ चव्हाण,दासाहेब भोसले,सुहास भोसले,



संजय पोळ यांच्यासह अन् मान्यवर उपस्थित होते. मार्डी फाटा,भोंगाव सोलापुर येथे कृष्णकमल हॉटेल व लॉजिंगच्या शुभारंभ प्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार बंजारा चेतना परिषदेचे जिल्हाध्यक्ष रवी पवार यांनी मानले.

# अपंग, वृद्धांना आता घरातून मतदानाची संधी; यंदाच्या लोकसभा निवडणुकीत देशभर सुविधा

पुणे : आगामी लोकसभा निवडणुकीत प्रथमच ८० पेक्षा जास्त वय असणारे आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त शारीरिक विकलांग असणाऱ्या नागरिकांना घरातून मतदानाची संधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील ८० पेक्षा जास्त वयोगटातील तब्बल २६ लाख ७० हजार, तर शारीरिक विकलांग पाच लाख ९० हजार ३८२ नागरिकांना या सुविधेद्वारे घरातून मतदान करता येणार आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी पुणे जिल्ह्याचा शुक्रवारी आढावा घेतला.



त्यानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली. देशपांडे म्हणाले, 'केंद्रीय निवडणूक आयोगाने यंदा प्रथमच ८० पेक्षा जास्त वयोगटातील आणि ४० टक्क्यांपेक्षा जास्त शारीरिक विकलांग नागरिकांसाठी घरातून मतदानाची संधी उपलब्ध करून दिली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर पाच दिवसांत जिल्हा प्रशासनाकडून मतदार यादीत नाव असणाऱ्या संबंधित नागरिकांना '१२-ड' हा अर्ज घरोघरी जाऊन दिला जाणार आहे. हा अर्ज या नागरिकांकडून भरून घेतला जाणार आहे. अर्जात संबंधित नागरिकांना घरातून मतदान करणार किंवा प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान करणार, याबाबतची माहिती घेतली जाईल. या अर्जांवर संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी निर्णय घेतील. या नागरिकांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मतदान केल्यास उर्वरित मतदारांना विशेत: तरुणांना त्यातून प्रोत्साहन मिळेल. मात्र, ज्या मतदारांना मतदान केंद्रावर जाऊन मतदान करता येत नाही, त्यांचे मतदान वाया जाऊ नये, म्हणून ही सुविधा सुरू केली आहे.' दरम्यान, घरातून मतदान करताना राजकीय पक्ष आणि निवडणुकीतील उमेदवारांचे प्रतिनिधी, निवडणूक अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित असतील. मतदानाचे चित्रीकरण केले जाणार आहे. यातून या सुविधेची पारदर्शकता जपली जाणार आहे, असेही देशपांडे यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्ग येथील घनकचरा व्यवस्थापन रोजंदारी मजुरांचे नगर परिषदे समोर ठिय्या आंदोलन

## ठेकेदार तुपाशी रोजंदार उपाशी साहेब आतातरी करा चौकाशी

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथे घनकचरा व्यवस्थापना मध्ये खूप मोठा गोंधळ दिसून येत आसुन गेल्या अनेक वर्षांपासून नळदुर्ग नगर परिषद धनकचरा व्यवस्थापना अंतर्गत मजुर रोजंदारी करतात याच रोजंदारीवर मोल मजुरीवर आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आसतो . परंतू ठेकेदाराने गेल्या तिन महिन्यापासुन घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत रोजंदारीवर जे मजूर रोजगार करतात त्या सफाई अस्वच्छतेचे करणाऱ्या मजुरांचा पगारच दिला नसल्याने त्या रोजंदारी मजुरावर उपासमारीची वेळ आलेली आहे उपासमारीची वेळ संबंधित ठेकेदार सान्वी मल्टीस्टेट सर्विसेस लातूर येथील आसुन या कंपनीने पोट गुत्तेदार ठेकेदार देऊन रोजंदारांचे हाल केले आहे .




आशा या ठेकेदारावर कारवाई करून त्याना काळ्या यादीत टाकण्यात यावे कंपनीच्या ठेकेदारावर शासन नियमा प्रमाणे कठोर कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे नळदुर्ग नगर परिषद अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन रोजंदारीवर रोजंदारी करणाऱ्या कामगारांना ठेकेदाराने रोजंदारीवर काम करणाऱ्या रोजगारांची कसल्याही प्रकारचे हाल आपेष्ठा होऊ नये त्यांची हेळसांड होऊ नये म्हणून ज्या ठेकेदाराने काम घेतले आहे अशा ठेकेदाराने त्यांना पगार दिला पाहिजे असे बंधनकारक आसताना सुद्धा गेली तीन महिन्यापासून त्यांचा पगार दिला नसल्याने शिवाय फक्त कामगाराना भुलथापा मारत ठेकेदाराने कामगाराच्या हातावर तुरीच ठेवल्या आहेत .

अस्वच्छतेचे काम करणारे सफाई कामगार आज नळदुर्ग नगर परिषदेच्या समोर ठेकेदाराच्या विरोधात ठिय्या आंदोलन करत असल्याचे निदर्शनास आले आहे हे आंदोलन गेल्या तीन महिन्यापासून ठेकेदाराने पगार दिला नाही शिवाय ज्या शासना अंतर्गत सुविधा दिल्या जातात ती सुविधाही ते मजुरांना पुरवत जात नाहीत महिन्याला पगार कमी दिला जातो कोणत्यातरी महिलेचा पगार आर्धा दिला जातो . या सर्व बाबी लक्षात घेता ठेकेदारावर कोणती कारवाई करावी हे प्रशासनाने ठरवावे अशी मागणी या मजुरातून होत आहे कारण दर महिन्याच्या १ ते ५ तारखेच्या आत या रोजंदारी करणाऱ्या मजुरांचा पगार केला जावा अशी प्रकारची नोंद परि पत्रकात आहे

घनकचरा व्यवस्थापनामध्ये एकुण ५२ मजुर रोजंदारीवर कामे करतात घंटा गाडी त्यांचे चालक ३० महिला आहेत ४ पुरुष ३ मुकदम आहेत शिवाय आणि कायम मजूर संख्या पाचवर आहेत संबंधित ठेकेदारांनी ५२ चा अकडा करावा लागतो जिल्हाधिकारी यांच्या मार्फत उच्च स्तरीय चोकाशी व्हावी आशी चर्चा सुजान नागरीकातुन होत आहे . हे याची निविदा टेंडर आणखीन ३१ मे पर्यंत असून या ३१ मे पर्यंत चा पगार संबंधित ठेकेदाराकडून सुरक्षारक्कम वाढीव घ्यावी आणि नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाने घनकचरा व्यवस्थापन नात रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांचा पगार करावा अशी मागणी या ठिकाणी होत आहे ही रोजंदारी शासना निकषा प्रमाणे चालकाला ६६० रु आसुन प्रत्येक मजुराला स्त्रि पुरुष समानता म्हणून ६०० रुपये ऐवढी आहे .

गेली तिन महिन्या पासुन घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत नळदृग मध्ये अस्वच्छतेचे काम करणाऱ्या रोजंदारी मजुरावर उपासमारीची वेळ आलेली असून ही उपासमारीची वेळ केवळ ठेकेदाराने आणलेली आहे अस्वच्छतेचे काम करणाऱ्या मजुरांना ठेकेदाराने साहित्य पुरवणी बंधनकारक आहे यामध्ये साहित्य गंभूत असेल मास्क असेल हॅन्डग्लोज गणवेश रेनकोट आणि ओळखपत्र देणे बंधनकारक आहे एकाही अस्वच्छतेचे काम करणार्या रोजगाराना ठेकेदारानी रोजगार तर दिलाच नाही परंतू कुठल्याही साधन सामग्री दिल्याचे दिसून येत नाही शिवाय ओळखपत्र सुद्धा दिलेले नाहीत त्यामुळे या रोजगारावर उपास मारीची वेळ आली आसुन आता तिसरा महिना संपला तरी सुद्धा ठेकेदाराने कामगारांच्या पोटावर कुऱ्हाड मारली आहे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत याच रोजंदारीवर आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवत आहे मग तीन-तीन महिने पगारी जर ठेकेदार ठेवत असतील मग रोजंदाराणी स्वतःच्या पोटाला बिबे घालायचे का असे बोलले जात आहे

वारंवार कळवून शिवाय नोटीस देऊन सुद्धा ठेकेदाराने मजुरांच्या हातावर शेवटी तुरीच ठेवल्या .

# प्रत्येक ग्रामपंचायत स्वयंपूर्ण झाली तर राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना : पालकमंत्री पाटील

## वडाचीवाडी आऊ ग्रामपंचायतीला ‘जिल्हास्तरीय सुंदर गाव’ पुरस्कार

पंढरपूर/प्रतिनिधीः गावाच्या सर्वांगीण विकासामध्ये ग्रामपंचायत महत्त्वाची भूमिका बजावत असते. शासनाच्या विविध योजनांच्या प्राप्त निधीची योग्य वापर करून गावाचा विकास करावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांचाही सहभाग महत्वाचा आहे. प्रत्येक ग्रामपंचायत स्वयंपूर्ण झाली तर राज्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केली.




सोलापूर जिल्हा परिषदेतर्फे आर.आर.( आबा) पाटील सुंदर गाव पुरस्कार, अमृत महाआवास अभियान पुरस्कार, आदर्श ग्रामसेवक पुरस्कार वितरणाचा सोहळा आज यश पॅलेस, कोर्टी रोड, पंढरपूर येथे संपन्न झाला. यावेळी जिल्हास्तरावरील पुरस्कारप्राप्त माढा तालुक्यातील वडाचीवाडी आऊ व तालुकास्तरावरील पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींचा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते तर आमदार सुभाष देशमुख, आमदार समाधान आवताडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहीनकर, उपमुख्याधिकारी ईधाधिन शेळकंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, जिल्ह्यातील गावे राज्यासाठी आदर्श निर्माण करणारे व्हावेत असा सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. लोकप्रतिनिधी आणि अधिकारी यांनी परस्पर समन्वयातून गावाच्या विकासासाठी नियोजन करावे. प्रत्येक गाव सुंदर व सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा. शासनामार्फत ग्रामीण भागातील दलित मागासवर्गीय लोकांचा सर्वागीण विकास व्हावा, यासाठी दलित वस्ती सुधार योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधीची उपलब्धता केली जाते.दलित वस्ती सुधार योजनेचा निधी त्याच कामासाठी वापर करुन रस्ते, वीज, पाणी आदी पायभुत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात असे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले. तसेच जून २०२४ सालापासून राज्यातील एकाही विद्यार्थिनीला उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमासाठी कोणतेही शैक्षणिक शुल्क भरावे लागणार नाहीत. विविध अभ्यासक्रमासाठी ही सवलत लागू राहणार असून विद्यार्थिनींनी या शैक्षणिक सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले

आमदार समाधान आवताडे म्हणाले, पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींनी आणखी जोमाने काम करुन राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींच्या सरपंच व ग्रामसेवकांनी परिसरातील इतर ग्रामपंचायतींना याबाबत मार्गदर्शन करावे.त्याच बरोबर प्रत्येक गावात सौर उर्जा प्रकल्प राबवावेत असे आवाहनही त्यांनी केले.

अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी संदिप कोहिनकर म्हणाले, पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींनी ग्रामपंचायत निधी तसेच त्यांना मिळणारा इतर शासकीय योजनांच्या निधीचा पुरेपूर वापर करून ग्रामपंचायत हद्दीत विकास केला आहे. जिल्ह्यात विविध योजनेमधून ७६ हजार घरकुले मंजूर असून त्यामध्ये ५६ हजार घरकुले पुर्ण झाली आहेत. तर २० हजार घरकुलांचे काम प्रगतिपथावर आहे. जिल्ह्यात जिल्हापरिषदेच्या विविध विभागाच्या माध्यमातून रस्ते, पाणी,स्वच्छता अभियान, घरकुल योजना आदी विकास जोमाने सुरु असल्याचे सांगितले.

मुलांना वाचनाची गोडी लावण्यासाठी व आनंददायी वाचनातून शिकण्यासाठी जिल्ह्यातील ११२ शाळांना ग्रंथालयासाठी ४१ हजार पुस्तके सीएसआर फंडातून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकारातून उपलब्ध करण्यात आली असून, लक्ष्मी टाकळी (ता.पंढरपूर ) येथील शाळेला प्राथनिधिक स्वरुपात पुस्तके पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते देण्यात आली

तालुकास्तरीय पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती- अक्कलकोट- वागदरी, बार्शी- अंबाबाईचीवाडी, करमाळा- खडकी ,माढा -वडाचीवाडी आऊ, माळशिरस- पुरंदावडे, मंगळवेढा- बालाजीनगर (लमान तांडा), मोहोळ - आष्टी, उत्तर सोलापूर- कौठाळी, पंढरपूर- तिसंगी, सांगोला -वाकी शिवणे, दक्षिण सोलापूर- दिंडूर

# संत गाडगे महाराजांचे विचार सत्यात आणावे : रंधवे




निफाड : श्री माणकेश्र्वर वाचनालय निफाड येथे संत गाडगे महाराजांची१४८वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. माजी नगरसेवक दिलीप कापसे आणि नाशिक जिल्हा युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष विक्रम रंधवे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करण्यात आले. वाचनालयाचे चिटणीस बाळासाहेब कापसे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार, चिटणीस बाळासाहेब कापसे,हिशोब तपासणीस दत्ता काका उगावकर, दिलीप कापसे, विक्रम रंधवे, अशोक कुंदे, मोहन जाधव माणिक गायकवाड, अनिरुद्ध कुंभार्डे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन बनसोडे, लेखनिक विद्या बंद्रे अनिता कांबळे आणि वाचक उपस्थित होते. उपस्थितांचे आभार वाचनालयाचे संचालक सुहास सुरळीकर यांनी मानले

# २४ फेब्रुवारी रोजी सोलापुरतील हेरिटेज मंगल कार्यालय येथे भव्य ऐतिहासिक देश भक्ती कार्यक्रम

अक्कलकोट/प्रतिनिधीः रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त जय भारत माता सेवा समितीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत सद्गुरु श्री ओम हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात शनिवार दि.२४ रोजी सोलापुरतील गांधी नगर येथील हेरिटेज मंगल कार्यालय येथे भव्य ऐतिहासिक देश भक्ती कार्यक्रम आयोजित केले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज कुठल्याही जात, धर्म आणि पक्ष व राजकारण बघितले नाही. त्यांनी देशासाठी राष्ट्रसाठी लढुन देश आणि राष्ट्र टिकवुन ठेवले आहे.महात्मा गांधी, ड्रॉ.बाबासाहेब आंबेडकर, शहीद भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, संगोळ्ळी रायण्णा, चंद्रशेखर आझाद, सुभासचंद्र बोस, मल्लप्पा धनशेट्टी, किसान सारडा, जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन असे अनेक महान व्यक्ती देशासाठी बलिदान दिले आहे.

या महान व्यक्तीना त्यांच्या जाती पुरते मर्यादित ठेऊ नये म्हणून राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज यंदा देशातील सर्व जाती धर्म आणि सर्व पक्षाला सोबत घेवुन शिवाजी महाराज यांचा जयंती उत्सव कार्यक्रम हाती घेतले असून शनिवार दि.२४ रोजी सोलापूरतील गांधी नगर येथील हेरिटेज मंगल कार्यालय येथे दिवसभर भरगच्च कार्यक्रम आयोजित केले आहेत.

# जिल्हा सत्र न्यायालय भिवंडी ह्यांनी मैत्रकुलच्या किशोर जगताप ह्याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला

भिवंडी : मैत्रकुलच्या किशोर जगताप याच्यावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा घडला त्यावेळी तरुणी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर पॉक्सो अंतर्गत कलम दाखल करण्यात आले होते.

त्या संदर्भात त्याने जिल्हा सत्र न्यायालय भिवंडी या ठिकाणी अटकपूर्व जामीन अर्ज सादर केला होता. किशोर जगताप याच्यावर त्यानेच स्थापन केलेल्या मैत्रकुल या निवासी अभ्यास केंद्रातील मुलींचा लैंगिक छळ केल्याची तक्रार तेथील एका विद्यार्थिनीने दाखल केली होती. त्याबाबतीत न्यायाधीशांनी दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेत जिल्हा सत्र न्यायालय भिवंडी यांनी किशोर जगताप याचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला आहे.

६ फेब्रुवारीला जामीन अर्जावर सुनावणी होणार होती. पण ती सुनावणी १७ फेब्रुवारी २०२४ रोजी झाली आहे. भिवंडीतील आरोपी किशोर जगताप हा दिव्यांग असून त्याने अतिरिक्त सत्र न्यायालय ,भिवंडी येथे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. पण जामीन मिळाला नाही. त्याचप्रमाणे इतर ही पीडित मुलींनी त्यांचा जबाब पडघा पोलिस ठाण्यात नोंदवायला सुरुवात केली आहे. यातील आणखी काही मुली गुन्हा घडतेवेळी अल्पवयीन असल्याचे समजते. त्यामुळे इथून पुढे हे प्रकरण कसे वळण घेते ? , मैत्रकुल मध्ये १००० स्क्वेअर फूट च्या जागेत ५० च्या वर तरुण, तरुणी एकत्र राहत असल्याने पीडितांच्या संख्येत वाढ होत आहे का ? याकडे कल्याण , भिवंडी मधील अनेक सामाजिक कार्यकर्ते व नागरिक यांचे लक्ष लागले आहे. यासंदर्भात तपास सुरु आहे. असे सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन मुदगुन यांनी बोलताना सांगितले.

# दिवे येथील विविध कार्यकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी गणपतआण्णा शितकल यांची निवड

पुरंदर/प्रतिनिधीः दिवे ता. पुरंदर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी गणपतआण्णा राघू शितकल यांची बिनविरोध निवड करण्यात आली,

सासवड येथील सहाय्यक निबंधक यांच्या कार्यालयात ही निवड करण्यात आली, निवडणूक निर्णय अधिकारी अमरीश ए. बागवान यांनी गणपतआण्णा शितकल यांची कातोबा विविध कार्यकारी सहकारी सोसायटी दिवे या संस्थेच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली, यावेळी संचालक बाळासाहेब काळे, मोहन जाधव ,दिनकर गायकवाड, राजेंद्र काळे, वैभव झेंडे, गजानन जाधव, संतोष जाधव, दिलीप जाधव, नंदा जाधव, उदयानी जाधवराव, सरपंच योगेश काळे, गुलाब झेंडे, अमित झेंडे, बबनराव लडकत, बापू राऊत, रुपेश राऊत अजित गोळे, बापू मोकाशी आदी मान्यवर उपस्थित होते,

गणपतआण्णा शितकल यांची चेअरमनपदी निवड झाल्यानंतर महाराष्ट्र राज्याचे माजी कृषीराज्यमंत्री दादासाहेब जाधवराव, भारतीय जनता पक्षाचे पुरंदर हवेली विधानसभा मतदारसंघाचे प्रभारी बाबाराजे जाधवराव सासवड नगरपरिषदेचे माजी नगरसेवक बिटू भांडवलकर, गंगाराम जाधव सर , लालासाहेब भंडलकर, आप्पा भांडवलकर, साहेबराव जाधव, विलास चव्हाण, निलेश जाधव सतिश चव्हाण, विकास भांडवलकर गणेश खोमणे आदींनी शितकल यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या,

गणपतआण्णा शितकल यांनी, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ ( एसटी ) येथे सेवा केलेली आहे, सेवेत असतांनाही ते सामाजिक कार्यात कार्यरत होते, सद्या ते सेवानिवृत्त असल्याने, व त्यांनी गेले अनेक वर्षे, गावागाड्यात व सामाजिक कार्यात, केलेल्या कार्याची दखल घेऊन, संचालक मंडळाने त्यांच्यावर सोसायटीच्या चेअरमनपदाची जबाबदारी



सोपवली आहे, दिवे गावा सारख्या एका मोठ्या गावच्या सोसायटीच्या चेअरमनपदाची, व राजकीय दृष्ट्या जागृत असलेल्या गावात काम करण्याची संधी मिळाल्याने गणपत आण्णा शितकल यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे,




# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी गोगांव येथे जन जागृती अभियान संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः मतदानाचे टक्केवारी वाढविण्यासाठी गोगांव येथे जन जागृती अभियान राबविण्यात आले

यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, ग्रामसेवक विक्रम घाटे, जेष्ठ सदस्य प्रदीप जगताप, कृषी अधिकारी शिरगापुरे, मुख्याध्यापक दयानंद चोळे, तलाठी कोळी, पोलीस पाटील चंद्रकला गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होते यावेळी ग्रामसेवक घाटे यांनी मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी आयोजित जन जागृती अभियान बद्दल महत्व पटवून दिले गावातील सर्व राजकीय पक्षांनी आणि युवकांनी पुढाकार घेवून मतदारांना घरो घरी जावून मतदानाची महत्व सांगावे लोकशाही बळकट करण्यासाठी जास्ती जास्त मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले यावेळी जिल्हा परिषद शाळेच्या वतीने गावात रॅली काढून घोषणांच्या माध्यमातून जन जागृती करण्यात आले यावेळी शरणप्पा कलशेट्टी, महादेव पाटील, नितीन गायकवाड, दत्ता सोनकवाडे यासह अनेक युवा मतदार व ग्रामस्थ उपस्थित होते

# राज्यातील शेतीनिष्ठ शेतकरी व संस्थांचा होणार सन्मान : कृषिमंत्री धनंजय मुंडे

मुंबई.: सन २०२०, २०२१ व २०२२ करिता कृषी विभागामार्फत देण्यात येणारे शेतकरी व शेतीशी संबंधित संस्था यांचा सन्मान करणाऱ्या शासकीय पुरस्कारांची आज घोषणा करण्यात आली आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. त्या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.राज्य शासनाच्या कृषी व कृषी संलग्न क्षेत्र तसेच फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या शेतकरी व तत्सम संस्थांना डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यान पंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी व सर्वसाधारण गट), पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील कृषिरत्न पुरस्कार (मंत्रालय स्तर) असे विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.सन २०२० पासून कोरोनाच्या संकटाच्या काळात या पुरस्कारांच्या वितरणात खंड पडला होता. दरम्यान धनंजय मुंडे यांनी कृषिमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यापासून या तीनही वर्षातील कृषी विभागाच्या पुरस्कारांचे वितरण करण्याबाबत ते आग्रही होते. त्यानुसार सन २०२०, २०२१ व २०२२ मधील पुरस्कारांची विभागनिहाय घोषणा करण्यात आली आहे.कृषी विभागाच्या विविध पुरस्कारांच्या सोबतीने प्रोत्साहनपर रक्कम दिली जाते, त्या रकमेतही मंत्री श्री.मुंडे यांनी नुकतीच तब्बल चार पटीने वाढ केली आहे.दरम्यान लवकरच या पुरस्कारांचे शासन स्तरावर कार्यक्रम आयोजित करून वितरण करण्यात येणार असल्याचेही मंत्री श्री.मुंडे यांनी सांगितले.

# सर्व गावे चांगल्या रस्त्याला जोडू : आ.कल्याणशेट्टी

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील एकही रस्ता खराब राहणार नाही. सर्व गावे चांगल्या रस्त्याला जोडू, अशी ग्वाही आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली.

अंकलगे फाटा ते अंकलगे व राष्ट्रीय महामार्ग ते तळेवाड या रस्ते कामाचे भूमिपूजन आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना कल्याणशेट्टी म्हणाले, प्रत्येकाने आपापल्या कार्यकाळात रस्त्यासाठी निधी खेचून आणून योगदान दिले असते तर आज खराब रस्त्याची संख्या वाढली नसती. आतापर्यंत ही कामे न झाल्याने अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे जास्तीचा निधी मंजूर करून आणावा लागत आहे. केवळ राज्य व केंद्र सरकार अक्कलकोटसाठी सकारात्मक दाखवत आहेत म्हणून हे शक्य होत आहे.

येत्या वर्षभरात विधानसभा मतदारसंघातील एकही रस्ते खराब दिसणार नाही. प्रत्येक गाव प्रमुख रस्त्याला जोडू. जेणेकरून ग्रामीण भागातील जनतेला त्रास होणार नाही.

सर्वांची सोय होईल अशा पद्धतीने काम करू, असेही ते म्हणाले. अंकलगे येथे शिवानंद पाटील, मारुती कोळी, विलास



गव्हाणे, महादेव मुडवे, खंडप्पा वग्गे, शिवसिध्द बुळ्ळा, महादेव दोड्याळे, उपअभियंता अमोल खमितकर, ठेकेदार दत्ता मुळे तसेच राष्ट्रीय महामार्ग ते तळेवाड रस्ता भूमिपूजन प्रसंगी. आयप्पा हौदे, अशोक काळे, दंडप्पा पाटील, लक्ष्मण हौदे, बसप्पा जेऊर्गी, चिदानंद जेऊर्गी, विठ्ठल पाटील, परमेश्वर पाटील, अशोक बनसोडे, राजशेखर चौधरी, शंकर हार्डिकर, महेश क्षीरसागर, हणमंत नाईकवाडी, कल्लप्पा बिराजदार आदी उपस्थित होते.

## ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून २१ फेब्रुवारी ते ०६ मार्च २०२४ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळया जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील,

त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा,

तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

## अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत सोलापूर विभागातील चार रेल्वे स्थानकांचा होणार कायापालट

सोलापूर/प्रतिनिधीः अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत सोलापूर विभागातील चार रेल्वे स्थानकांचा कायापालट होणार असून सोमवार, २६ फेब्रुवारी रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पायाभूत सुविधांच्या पुनर्विकास कामांचा शुभारंभ व्हिडिओ कॉन्स्फरन्सद्वारे होणार आहे. यामध्ये सोलापूर विभागातील बेलापूर, गाणगापूर, दुधनी आणि जेऊर रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत देशभरातील १३०९ रेल्वे स्थानकांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे.

यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राला रेल्वेसाठी १५५५४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत ५६ स्थानके जागतिक दर्जाची रेल्वे स्थानके म्हणून विकसित करण्याचे नियोजन आहे. या योजनेतून बेलापूर रेल्वे स्थानकावर ३१.९६ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहे. यामध्ये पिण्याच्या पाण्याची उत्तम सोय, प्रसाधनगृहाची निर्मिती करणे, प्लॅटफॉर्मची लांबी वाढविणे, बुकिंग कार्यालयाचे

नूतनीकरण आदींचा समावेश आहे. गाणगापूर रेल्वे स्थानकासाठी २०.७८ कोटी, दुधनी रेल्वे स्थानकासाठी २१.८६ कोटी तर जेऊरसाठी १४.७३ कोटी रुपये विविध विकासकामांवर खर्च करण्यात येणार आहे. या सर्वच रेल्वे स्थानकांवर शुध्द हवा राखण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानातील फॅन, दिव्यांगांसाठी प्लोअरिंग, प्लॅटफॉर्मची लांबी वाढविणे, बुकिंग कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. अमृत भारत योजनेअंतर्गत सोलापूर मंडळातील कार्मिक विभागातर्फे '२०४७ भारत विकास रेल' या विषयावर १७ शाळांमध्ये चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये २२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यातील २०८ विद्यार्थ्यांच्या निबंध व चित्राची निवड करण्यात आली आहे. २६ रोजीच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचे हस्ते या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.

## श्री संत दामाजी कारखान्याचे १५ जानेवारी पर्यंतची उस बिले अदा

### अध्यक्ष शिवानंद पाटील यांची माहिती

मंगळवेढा/प्रतिनिधी : साखर उताऱ्यामध्ये तालुक्यात आघाडीवर असलेल्या असलेल्या श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यास गाळपास दिलेल्या ऊस उत्पादकाचे १५ जानेवारी पर्यंतचे देयक २७०१ प्रमाणे बँक खात्यावर जमा करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष शिवानंद पाटील यांनी दिली याप्रसंगी उपाध्यक्ष तानाजी खरात,संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणुकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्राकार्यकारी संचालक रमेश जायभाय सह सर्व खातेप्रमुख उपस्थित होते. अधिक माहिती देताना अध्यक्ष पाटील म्हणाले की चालु हंगामात दामाजी कारखान्याने आजअखेर एकूण ३,४६,४६४ मे।टन गाळप केले असून एकूण ३,४९,३८० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन करून सरासरी साखर उतारा १०.१४ मिळाला.चालु गळीत हंगाम अंतीम टप्प्यात आला असून कार्यक्षेत्रातील सभासद व शेतकऱ्यांचा संपुर्ण ऊस गाळप केल्याशिवाय दामाजी कारखान्याचा हंगाम बंद करणार नाही.

शिवाय सदरचे बिल शेतकऱ्याचे सोयीनुसार धनश्री पतसंस्थेच्या सर्व शाखा, जिजामाता पतसंस्था मंगळवेढा, रतनचंद शहा सह।बँक-मंगळवेढा इत्यादी संबंधीत बँकां/पतसंस्थामधील खात्यामध्ये वर्ग केले तर १६ ते ३१ जानेवारी २४ चे ऊस तोडणी वाहतुक बिले संबंधीत बँका,पतसंस्थातील ठेकेदारांचे नांवावर यापुर्वीच वर्ग केले. पतसंस्थेकडून शेतकरी ठेकेदारांचे खातेवर रक्कम वर्ग होणेसाठी दोन दिवसाचा वेळ सोडून कारखान्याचे शेती विभागाकडील कर्मचाऱ्यांकडून ऊस बिलाची पावती घेवून संबंधीत बँकेतून ऊस बिलाची रक्कम घेवून जावे असे आवाहन अध्यक्ष पाटील यांनी केले.

# हत्तीकणबस केंद्रशाळेचे वनभोजन उपक्रम आनंदात यशस्वी

### निसर्गाशी मैत्री करा : गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे

अक्कलकोट/प्रतिनिधीः केंद्रशाळा हत्तीकणबसच्या शाळेची क्षेत्रभेट व वनभोजन कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत आरबाळे यांनी भेट दिली. दरवर्षी प्रगतशील शेतकरी सिद्रामप्पा लिंगाप्पा दोड्याळे यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना व शिक्षक स्टॉफला दरवर्षी दोड्याळे मामांनी स्वखर्चाने जेवणाची व्यवस्था करतात याही वर्षी वनभोजनाचा कार्यक्रम आनंदी वातावरणात पार पडला. यावेळी या नियोजनबद्ध व शिस्तबद्ध वनभोजनास पंचायत समिती अक्कलकोटचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांनी या उपक्रमाचे व दोड्याळे मामा यांनी घेतलेल्या परिश्रमाचे कौतुक करून दोड्याळे मामांचे सत्कार करण्यात आले. हे सर्व उपस्थितांनी मिष्ठान्न भोजनाचे आस्वाद घेतला.



या उपक्रमात गटशिक्षणाधिकारी श्री. प्रशांत आरबाळे , केंद्रप्रमुख जीवराज खोबरे, बी. आर. सी. तज्ञ दसरे सर, शा. पो. आ. तज्ञ श्री. गुरव सर, आदर्श उपक्रमशील शिक्षक तुकाराम जाधव सर, श्री. सतीश वाले सर, केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी , श्री. शिवानंद मंगरुळे, सौ. बबिता कोरेकर, सौ. उषा गायकवाड, श्री. राजाराम सुरवसे, श्री. शीतल डावरे, श्री. अरुण पांचाळ, श्री. विक्रम जाधव हे शिक्षक स्टॉफ व गावचे सरपंच श्री. श्रीशैल माळी, श्री.सिद्रामप्पा लिंगाप्पा दोड्याळे प्रगतशील शेतकरी श्री. संजय हिरापुरे, ग्रा. पं. सदस्य श्री. नागेंद्र मेळकुंदे, ग्रा. पं. सदस्य श्री. सैदप्पा निंबाळे माजी अध्यक्ष ड.च.उ. श्रीशैल पाटील, हणमंत बिराजदार, आणप्पा गाडेकर, विरभद्र मेळकुंदे, नितीन दोड्याळे, काशीनाथ पाटील, संजय उण्णद, बसवराज बंदीछोडे, पंडू गाडेकर, डॉ. एन. आर. रोगे समाजसेवक व इतर ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी मुलांनी दिवसभर मनोरंजक खेळ गाणी व शेतातील आधुनिक शेती प्रकल्पाची माहिती घेतली. शेवटी केंद्रीय मुख्याध्यापक श्री. इस्माईल मुर्डी यांनी उपस्थितांचे सत्कार करून आभार मानले.

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शेळगी ते दहिटणे रस्ता रुंदीकरणासह काँक्रिटीकरण कामाचे उद्घाटन

सोलापूर/प्रतिनिधीः शेळगी (पोलीस चौकी) ते दहिटणे रस्ता रुंदीकरणासह काँक्रिटीकरण करणे तसेच ड्रेनेज लाईनच्या कामाचे उद्घाटन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



या रस्ता विकास कामांसाठी ११ कोटी ४६ लाख तर ड्रेनेज लाईन साठी ४५ लाख इतका निधी मंजूर आहे. यावेळी खासदार जय सिध्देश्र्वर शिवाचार्य महास्वामी, आमदार विजयकुमार देशमुख, किरण देशमुख, मोहन डांगरे, हरिदादा सरवदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दत्तात्रय गावडे अन्य मान्यवर यांच्या सह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## आर्मी सदभावना मोहिमेचे नेतृत्व सैनिक टाकळीचे सुपुत्र सुबेदार विनायक पाटील यांच्या हाती

सैनिक टाकळी /संजय चव्हाण :आपला भारत मातेचा भूभाग हा सर्व दुश्मन देशानी घेरला आहे. आपली इतकी प्रभळ सेना आहे पण ती सर्व सीमा रेषेवरती सुरक्षा करू शकत नाही. त्यावेळी आपल्या भारत मातेच्या सेवेसाठी सीमारेषे जवळ असणारी गावे व तेथील जनता जनार्दन यांचा देश सेवेसाठी वाटा खूप महत्त्वाचा असतो. आपला देश विविध भाषा, रंग व संग यांनी नटलेला आहे. त्यांचे रहण सहन आणि दुसऱ्या राज्यातील लोकांचे रहण सहन याची देवाण घेवाण व्हावी व या दुर्गम भागातील गोरगरीब कुटुंब जी देश सेवेसाठी प्रथम शत्रूबरोबर लढण्यासाठी येतात अशा कुटुंबाचे भविष्य घडविण्यासाठी व देशाच्या प्रवाहा बरोबर जोडण्यासाठी आपल्या इंडियन आर्मीच्या माध्यमातून केंद्र सरकारने ऑपरेशन सदभावणा ही मोहीम सुरू केली आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून आपल्या महाराष्ट्राची १५ मराठा लाईट इन्फंट्री बटालियन यांच्याद्वारे भारत - चीन सीमा जवळ असणारे आपले अरुणाचल राज्य येथे एक भव्य कल्चरल प्रोग्रामचे आयोजन करून आपल्या महाराष्ट्राच्या रूढी व परंपरा तेथील लोकांना आपल्या विविध कला द्वारे कशा अवगत केल्या आहेत. त्यांची रूढी व परंपरा कशी असते हे आपल्या लोकांना दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व मोहिमेचे नेतृत्व करण्याचा मान सैनिक टाकळीचे सुपुत्र सुभेदार विनायक बाळासाहेब पाटील यांना मिळाला ही गोष्ट सैनिक टाकळी करांच्या अभिमानाची आहे. १५ मराठा लाईट इन्फंट्रीच्या युनिटला योग्य आयोजनाबद्दल अरुणाचल सरकारच्या वतीने प्रशस्थी पत्र देऊन मान सन्मान करणेत आला.




## पुरंदर तालुका वंचित बहुजन आघाडीच्या महासचिवपदी सचिन तुरुकमारे तर उपाध्यक्षपदी जाफरभाई सय्यद यांची निवड

पुरंदर /प्रतिनिधीः गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे वंचित बहुजन आघाडी तालुका कार्यकारीणीची बैठक पुणे जिल्हा पश्र्चिम उपाध्यक्ष राहूल गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली याप्रसंगी नवनियुक्त पदाधिकारी यांची तालुका कार्यकारीणीवर निवड करण्यात आली. पुरंदर तालुक्यात पक्षाचा वाढ-विस्तार आणि गट, गण, ग्रामशाखेचे नियोजन कसे करावे.? या संदर्भात चर्चा केली.यावेळी उपाध्यक्ष जाफरभाई सय्यद, महासचिव सचिन तुरुकमारे, संघटक अजय कांबळे, प्रसिद्धी प्रमुख शाम जगताप यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.बैठकीसाठी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष शाम माने, उपाध्यक्ष अनिल धिवार, कामगार नेते स्वप्निल भालेराव, हवेली तालुका प्रसिद्ध प्रमुख सदाशिव कांबळे, प्रकाश बाबर, सारंग सोनवणे, रामराव गायकवाड, सुमित पाटोळे, विशाल गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.




**बार्टीच्या वतीने संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त सदलापुर ग्रामपंचायत येथे सरपंच सौ मुक्ताबाई शिवानंद पटणेयांच्या हस्ते गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले व तसेच समाज कल्याण विभाग व बार्टीच्या विविध योजनांची माहिती समतादुत सौ.नालंदा चंदनशिवे यांनी दिली सदर कार्यक्रमास ग्रामपंचायतीतील उपसरपंच सुनील बनसोडे जगन्नाथ पाटील नागेंद्र पाटील चंद्रकांत सुतार सर काशिनाथ भोसगी सिकंदर जमादार शिवानंद पटणे विठ्ठल रुद्र ग्रामपंचायत कर्मचारी मौलाली मुल्ला उपस्थित होते**